# Greenlawns School - Worli

**Final Examination - 2016 -2017**

कक्षा :- सहावी  पूर्णांक :- 80

विषय :- मराठी

दिनांक :- 20·02·17  समय :- 2 घण्टे

---

सूचना :- 1. सभी प्रश्न अनिवार्य हैं ।

2. शुद्ध भाषा एवं सुवाच्य लेखन अपेक्षित हैं ।

---

## विभाग - अ

### भाषा - विभाग (Marks - 40)

प्रश्न 1) खालीलपैकी एका विषयावर १५ ते १८ ओळींचा निबंध लिहा :- (08)

i. मी केलेला प्रवास

ii. ' पाणी हेच जीवन '

iii. मी झाड झालो / झाले तर ......

प्रश्न 2) खालील मुद्दयांच्या आधारे गोष्ट तयार करुन योग्य शीर्षक द्या :- (5)

दोन मित्र ..... जंगलातून प्रवास ..... समोरून अस्वल येताना दिसणे ..... एकजण झाडावर चढतो ..... दुसरा मेल्यासारखा पडून राहतो ..... अस्वल त्याला हुंगून निघून जाते ..... झाडावरील मित्र खाली उतरतो ..... अस्वलाने कानात काय सांगितले असे विचारणे ..... तात्पर्य ..... शीर्षक.

प्रश्न 3) खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :- (10)

चंदू आईवडिलांबरोबर जिजामाता उद्यानात फिरायला गेला. त्याने माकडांबरोबर नाच केला. तो हरणांबरोबर पकडापकडी खेळला. सशांबरोबर लपंडाव खेळला. त्याला खूप मजा वाटली. संध्याकाळ झाली. बाबा म्हणाले, " चंदू , आता घरी चलायचं ! " झाडाखाली एक अरबी घोडा बसलेला होता. तो आजारी पडला होता. बागेतील माळी एका डॉक्टरांना घेऊन आला. डॉक्टरांनी घोड्याला तपासले. त्याला इन्जेक्शन दिले. त्याच्या पायावर झालेल्या

---

जखमेवर मलमपट्टी केली. " प्राण्यांचे पण डॉक्टर असतात का ग आई ? " चंदूने उत्सुकतेने विचारले. " हो ! तू आजारी झालास की डॉक्टर तुला औषध देतात , इन्जेक्शन देतात , तसेच प्राणीही आजारी पडतात, त्यांनाही ताप येतो , मग डॉक्टर त्यांना औषध देतात, इन्जेक्शन देतात आणि त्यांना आजारातून बरे करतात. मग ती आनंदाने नाचूबागडू लागतात. या प्राण्यांच्या डॉक्टरांना ' पशुवैद्य ' म्हणतात. आपण त्यांना प्राण्यांचे डॉक्टर म्हणू ! " " मग मी होऊ का प्राण्यांचा डॉक्टर ? " चंदूने आनंदाने विचारले. " हो , तू प्राण्यांचा डॉक्टर झालास , म्हणजे तुला दिवसभर प्राण्यांबरोबर राहता येईल. ते आजारी झाले तर त्यांना औषध देऊन बरं करता येईल. तुला त्यांना आनंदी व सुखी करता येईल. म्हणून चंदू , तू प्राण्यांचा डॉक्टर हो ! " आईने चंदूला समजाविले. रस्त्यातून घरी येताना चंदू आईला म्हणाला , " प्राणी किती चांगले असतात , ते माणसाची सेवा करतात तरीही माणूस त्यांना क्रूरपणे वागवतो. आपण त्यांची सेवा करायला हवी नाही का ग आई ? "

प्रश्न :-

i. चंदूला मजा कोठे वाटली व का ? (2)

ii. डॉक्टरांनी आजारी घोड्यावर कोणता उपचार केला ? (2)

iii. पशुवैद्य कोणाला म्हणतात ? ते काय करतात ? (2)

iv. चंदूने प्राण्यांचा डॉक्टर व्हावे असे आईला का वाटते ? (2)

v. वाक्य बनवा :- सेवा , उद्यान (2)

## व्याकरण - विभाग

प्रश्न 4) अ) समानार्थी शब्द लिहा :- (2)

1. उडी 2. शेवट
3. किनारा 4. ओझे

ब) विरुद्धार्थी शब्द लिहा :- (2)

1. गोड 2. टणक
3. निकृष्ट 4. अवघड

क) लिंग ओळखा :- (2)

1. घर 2. हवा

3. पान 4. माठ

ड) वचन बदला :- (2)

1. भिंत 2. डोंगर

3. निवारा 4. चिमणी

ज) खालील शब्द शुद्ध करून लिहा :- (2)

1. वनिकरन 2. वाहतुक

3. कैफीयत 4. इवलिसी

प्रश्न 4) अ) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा :- (2)

1. हत्तीचे ओरडणे

2. लाकूडकाम करणारा

3. म्हशीचे पिल्लू

4. समाजाची सेवा करणारा

प्रश्न 4) आ) खालील वाक्यातील काळ ओळखून त्यांचे प्रकार लिहा :- (2)

1. रिमा सहलीला जाईल.

2. सूर्य पूर्वेला उगवतो.

प्रश्न 4) इ) खालील वाक्यात योग्य ठिकाणी विरामचिन्हांचा उपयोग करून वाक्ये परत लिहा :- (2)

1. समुद्र समुद्र म्हणतात तो आला की

2. आवडले का तुला पुस्तक आई म्हणाली

प्रश्न 4) ई) वाक्प्रचारांचे अर्थ लिहा :- (1)

1. घाबरगुंडी उडणे

2. अभिनंदन करणे



उलटकर देखिए

## विभाग - ब

## साहित्य - विभाग (40 Marks)

प्रश्न 5) अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :- (12)

i. अप्पाजींनी ताजी कोबी कलिंग देशाकडे कशी पाठवली ?

ii. लेखिकेने नदीचे वर्णन कसे केले आहे ?

iii. चिमणी व मासोळीने आपली कोणती समस्या मांडली आहे ?

iv. नागोबाची तक्रार कोणती आहे ?

प्रश्न 5) आ) कोण, कोणास व केव्हा म्हणाले ते लिहा :- (4)

i. " घाबरू नकोस, हा तर खेकडा ! "

ii. " त्याचं नाव घोडमासा, समुद्रघोडा ! "

प्रश्न 5) इ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :- (4)

i. समुद्राच्या खोलवर अंधार का असतो ?

ii. कलिंगचा राजा संतुष्ट का झाला ?

iii. मिनू मासोळी कुठे राहायची ?

iv. उत्कृष्ट दर्जाची मूर्ती कोणती ?

प्रश्न 5) ई) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :- (4)

i. तो .................. हात असेलेला .................. मासा.

ii. त्या काही आजच्या सारखी .................. .................. साधने नव्हती.

iii. आम्ही सदा करीन .................. हिरवेगार .................. ।

iv. इथं या दोन शिंपल्यांच्या .................. एक .................. बसलेला असतो बरं का !

प्रश्न 5) उ) नावे लिहा :- (3)

1. विजयनगरचा राजा

2. प्लॅस्टिक सेवानाने पोटदुखी

3. या प्राण्याच्या तोंडाजवळ दोन नांग्या असतात

4. परीक्षा घेणाऱ्या राजाचे राज्य

5. जमीन व पाणी या दोन्ही ठिकाणी राहणारा

6. जमिनीवरी राहणारे

प्रश्न 5) ऊ) शब्दार्थ लिहा :- (3)

1. कुजून 2. बावरून

3. कवच 4. कल्ले

5. लाह्या 6. गडप

## कविता - विभाग

प्रश्न 6) अ)

1. चंद्रावरच्या शाळेत चांदण्यांशीच का खेळावे लागणार आहे ? (2)
2. घराने कोणत्या गोष्टी जवळ कराव्यात ? (1)
3. ' घर ' या कवितेच्या कवीचे नाव लिहा. (1)

आ) खालील दिलेल्या कवितेच्या ओळी पूर्ण करा :- (4)

दप्तराचे ....................................

..................................................

..................................................

................................. पटपट

इ) जोड्या जुळवा :- (2)

| " अ " | | " ब " | |
|---|---|---|---|
| 1. | आनंदी | अ. | गोष्ट |
| 2. | चविष्ट | आ. | भिंती |
| 3. | चार | इ. | जेवण |
| 4. | सुंदर | ई. | वास्तू |

----------------- स मा प्त -----------------